**Bharatiya Vidya Bhavan's**

Sardar Patel College of Engineering

**(Govt. Aided Autonomous Institute Affiliated to University of Mumbai)**

**Bhavan's Campus, Munshi Nagar, Andheri (West), Mumbai – 400058.**

# NOTICE

Dated: 05.05.2020

As per Maharashtra Government Resolution, Finance Department dated 31st March 2020 and 1st April 2020 and letter dated 1st April 2020 by Director, Technical Education, Maharashtra State, Salary for Faculty Members and Supporting Staff is drawn as per the instructions and guidelines given therein.

Faculty Member (Class I) are paid 50% Salary, Supporting Staff (Class III) are paid 75% and Supporting Staff (Class IV) 100% Salary. Remaining Percentage of Salary will be paid as and when the Office of Director Technical Education instructs the institute accordingly.

Further, for any queries related to payment of salary, Faculty Members and Supporting Staff can approach the accounts section, whenever the college reopens as per the instructions of the Director, Technical Education.

Looking at the present scenario of COVID-19 virus, faculty members and supporting staff are requested to adopt preventive measures for protecting themselves, their family members and others from the spread of COVID-19 virus.

**I/c. PRINCIPAL**

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९४३१,
ई-मेल – desk11@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक:११/तंशिसं/२०२०/ WFH April / १
दिनांक : ०१/०४/२०२०

प्रती ,

१)सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद / नाशिक / अमरावती

**विषय :-** मार्च २०२० ची वेतन देयके तयार करण्याबाबत मार्गदर्शक सूचना

**संदर्भ :-** 1) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परीपत्रक क्र. संकीर्ण -2020/प्र.क्र.62/कोषा प्रशा-5 मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक , मंत्रालय, मुंबई-400 032.
तारीख : 31 मार्च, 2020

**2**) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परीपत्रक क्र. संकीर्ण --2020/प्र.क्र.62/कोषा प्रशा-5 मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक , मंत्रालय, मुंबई-400 032.
दिनांक: 01 एप्रिल, 2020.

कोव्हीड-19 मुळे निर्माण झालेल्या आरोग्य व आर्थिक आपत्तीवर मात करण्याच्या दृष्ट्टीने राज्याची एकंदर आर्थिक परिस्थिती विचारात घेता, खर्चात काटकसर करणे तसेच काही खर्च पुढे ढकलणे गरजेचे असल्याने मार्च , 2020 चे एप्रिल , 2020 मध्ये प्रदान करण्यात येणारे वेतन दोन टप्प्यात अदा करण्याचा निर्णय उपरोक्त संदर्भ क्र १ येथील नमूद शासन परीपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

त्या अनुषंगाने मार्च २०२० च्या वेतनाच्या पहिल्या टप्प्याची वेतन देयके कशा पद्धतीने तयार करावीत याबाबत सविस्तर सूचना आता संदर्भ २ येथील परिपत्रकान्वये निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सेवार्थ प्रणालीद्वारे व सेवार्थ प्रणाली शिवाय वेतन आहरित करणाऱ्या सर्व संस्था / कार्यालये यांना या सूचना लागू आहेत.

सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालक यांनी सदर परिपत्रकाची नोंद घेऊन आपल्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या मार्च २०२० च्या वेतनाबाबत उचित कार्यवाही करावी . तसेच सदर परिपत्रके आपल्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थांना ( सेवार्थ प्रणालीद्वारे व सेवार्थ प्रणाली शिवाय वेतन आहरित करणाऱ्या सर्व संस्था ) उचित कार्यवाहीसाठी तातडीने अग्रेषित करावी

**स्वाक्षरी /-**

( डॉ अभय वाघ )

संचालक, तंत्रशिक्षण, म. रा.

प्रत :- संचालक , महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव व पुढील उचित कार्यवाहीसाठी

<u>माहे मार्च, २०२० च्या वेतन प्रदानाबाबत...</u>

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**तारीख : ३१ मार्च, २०२०.**

## शासन परिपत्रक

कोव्हीड-१९ मुळे निर्माण झालेल्या आरोग्य व आर्थिक आपत्तीवर मात करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांमार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत. सर्व खाजगी आस्थापना व उद्योग बंद असून त्यातून प्राप्त होणाऱ्या महसूलात लक्षणीय घट झाली आहे. सर्व शासकीय कार्यालये ५% कर्मचारी क्षमतेने कार्यरत आहेत. आर्थिक वर्षाअखेर राज्याची एकंदर आर्थिक परिस्थिती विचारात घेता, खर्चात काटकसर करणे तसेच काही खर्च पुढे ढकलणे गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सर्व निवडून आलेले लोकप्रतिनिधी तसेच शासकीय / निमशासकीय / विद्यापिठांसह सर्व अनुदानित संस्थामधील सर्व अधिकारी व कर्मचारी (अखिल भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यांसह) यांचे माहे मार्च, २०२० चे माहे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान करण्यात येणारे वेतन दोन टप्प्यात अदा करण्यात यावे.

| गट/तपशिल | सध्या अदा करावयाच्या वेतनाची टक्केवारी |
|---|---|
| मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, मा.सभापती व उप सभापती (विधानपरिषद), मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष (विधानसभा), मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद), सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, सर्व महामंडळांचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी व निवडून आलेले प्रतिनिधी. | ४०% |
| गट अ | ५०% |
| गट ब | ५०% |
| गट क | ७५% |
| गट ड | १००% |

उर्वरित वेतनाची रक्कम अदा करण्याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

राज्यातील सर्व अस्थायी पदांची मुदत प्रतिवर्षी माहे फेब्रुवारी अखेर संपुष्टात येते. अशा पदांचे वेतन आहरित करण्यापूर्वी दि.१ मार्च पासून अशा पदांना मुदतवाढ देण्याचे आदेश संबंधित प्रशासकीय विभागांमार्फत निर्गमित करण्यात येतात. सदर आदेशाद्वारे सर्व विभागांच्या अस्थायी पदांना दि. ३१ मे, २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदरचे आदेश सर्व सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील लागू राहतील.

सदर आदेशाच्या अनुषंगाने तपशीलवार सूचना वित्त विभागामार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२००३३११४३२५३१५०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

AJOY MEHTA

Digitally signed by AJOY MEHTA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6cd985f04d38fef505754856131307df708dca9bbcea90df80882d2257d79126, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=85c1fa2cdc7cf754bc479fb6ae97bc65889de163fa7e4c775fec1ed9e37334f3, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=AJOY MEHTA
Date: 2020.03.31 14:36:29 +05'30'

**(अजोय मेहता)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१.मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. राज्यपालांचे सचिव
४. मुख्यमंत्र्यांचे सचिव
५. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
६. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई

१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर
१४.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१५.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१६.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
२९.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई
३०. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
३१.वित्त विभागातील सर्व कार्यासने
३२.निवड नस्ती कोषा प्रशा-५.

**<u>सेवार्थ प्रणालीद्वारे माहे मार्च, २०२० ची वेतन देयके तयार करण्याबाबतची कार्यपध्दती...</u>**

# महाराष्ट्र शासन

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक: ०१ एप्रिल, २०२०.**

**<u>शासन परिपत्रक</u>**

**वाचा:- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.६२/कोषा प्रशा-५, दि.३१.०३.२०२०**

कोव्हीड-१९ मुळे निर्माण झालेल्या आरोग्य व आर्थिक आपत्तीवर मात करण्याच्या दृष्टीने राज्याची एकंदर आर्थिक परिस्थिती विचारात घेता, खर्चात काटकसर करणे तसेच काही खर्च पुढे ढकलणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने माहे मार्च, २०२० चे एप्रिल, २०२० मध्ये प्रदान करण्यात येणारे वेतन दोन टप्प्यात अदा करण्याचा निर्णय उपरोक्त वाचा येथील नमूद शासन परिपत्रकान्वये घेण्यात आला आहे.

२. या प्रयोजनासाठी वेतन म्हणजे सर्व अनुज्ञेय भत्त्यांसह वेतन विचारात घ्यावे.

३. वेतन आहरीत करण्याची कार्यवाही व सेवार्थ प्रणालीमार्फत माहे मार्च, २०२० ची पहिल्या टप्प्याची वेतन देयके तयार करणेबाबत कोषागारे आणि आहरण व संवितरण अधिकारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. पहिल्या टप्प्यात माहे मार्च, २०२० चे वेतन मा. लोकप्रतिनिधींना ४०%, गट अ व ब वर्गातील कर्मचाऱ्यांकरीता ५०%, गट क वर्गातील कर्मचाऱ्यांकरीता ७५%, याप्रमाणे वेतन प्रदान करण्यात येणार आहे. तथापि, गट ड कर्मचाऱ्यांचे एकाच टप्प्यात १००% वेतन प्रदान करण्यात येणार आहे.

२. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे पहिल्या टप्प्यातील वेतन अदा करण्याच्या दृष्टीने अधिकारी/कर्मचारी यांची संपूर्ण महिन्याची उपस्थिती विचारात घ्यावी. उपस्थित दिवसांपैकी उपरोक्तप्रमाणे नमूद केलेल्या टक्केवारीनुसार पहिल्या टप्प्यात वेतन आहरित करण्याच्या दिवसांची गणना करावी. टक्केवारीनुसार उपस्थित दिवसांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास ती पुढील पूर्णांकात मोजावी आणि तेवढयाच दिवसांचे वेतन देयक सेवार्थ प्रणालीतून तयार करावे. असे करताना कोव्हीड-१९ चा संसर्ग रोखण्याकरीता देण्यात आलेल्या सवलतीचा कालावधी हा कार्यालयीन उपस्थितीचा कालावधी म्हणून गणण्यात यावा. उदाहरणादाखल मार्च, २०२० या संपूर्ण महिन्यात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची पहिल्या टप्प्यातील वेतनाच्या दृष्टीने ग्राहय धरावयाच्या उपस्थितीच्या दिवसांची गणना खाली दर्शविली आहे.

| | |
|---|---|
| ४०% | कालावधी दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक १३/०३/२०२० |
| ५०% | कालावधी दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक १६/०३/२०२० |
| ७५% | कालावधी दिनांक ०१/०३/२०२० ते दिनांक २४/०३/२०२० |

३. उपरोक्त प्रमाणे ठराविक कालावधीचे वेतन काढण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी **(गट अ, ब व क)** असे स्वतंत्र नवीन "सप्लीमेंटरी बील" ग्रुप तयार करुन सदर "बील ग्रुप" मध्ये संबंधितांना "अटॅच" करण्यात यावे.

४. एकूण उपस्थितीच्या ४०%, ५०%, ७५% याप्रमाणे देयके संस्करीत करावयाची झाल्यास सेवार्थ प्रणालीत असलेल्या "Broken Period" या पर्यायाअंतर्गत देयके संस्करीत करणे आवश्यक आहे.

५. माहे मार्च, २०२० चे वेतन काढण्यासाठी Supp./Arrears/Susp./Nill billgroup या रेडिओ बटनावर क्लिक करुन, Pay Year २०१९-२०२० व Pay Month मार्च "सिलेक्ट" करावा.

६. "सेवार्थ" प्रणालीत Assistant Login → Current Path: Worklist → Payroll → Employee Information → Broken Period या मार्गाव्दारे उपस्थितीच्या नोंदी घेऊन Broken Period "सेव्ह" करावा. "Broken Period" हा पर्याय केवळ ४०%, ५०%, ७५% वेतन अदा करण्याकरीताच वापरावा.

७. गट "ड" साठी "रेग्यूलर बील ग्रुप" चा वापर करुन Bill Type - Regular निवड करुनच त्यांचे वेतन देयक तयार करावे.

८. गट अ, ब व क चे चेंज स्टेटमेंट करताना प्रथम वर्ष २०२०, महिना मार्च त्यानंतर "बिल ग्रुप" निवडावा. तदनंतर बिल टाईप सप्लीमेंटरी पे बिल सिलेक्ट करुन चेंज स्टेटमेंट जनरेट करावे.

## ४. देयकातून करावयाच्या विविध कपाती :-

१) एन.पी.एस. कर्मचाऱ्यांचे स्वत:चे अंशदान व नियोक्त्याचे अंशदान हे जेवढया दिवसांचे वेतन आहरित करण्यात येत आहे तेवढयाच कालावधीशी मर्यादित कपात करावी.

२) गट अ, ब व क कर्मचाऱ्यांच्या बाबतीत भविष्य निर्वाह निधी वर्गणीची १००% कपात पुढील टप्प्यात आहरित करावयाच्या वेतनातून करण्यात यावी. तथापि, मासिक वर्गणीची रक्कम दुसऱ्या हप्त्याच्या देय रकमेपेक्षा जास्त असल्यास मासिक वर्गणी दुसऱ्या हप्त्याच्या रकमेइतकी सिमीत करावी.

३) शासकीय कर्मचाऱ्याने घेतलेल्या अग्रिमाच्या मुद्दल/व्याजाची वसुली मार्च महिन्याच्या वेतनातून करण्यात येऊ नये. असे केल्यामुळे अग्रिम वसूलीचा कालावधी सध्याच्या नियोजनापेक्षा एक महिन्याने पुढे जाणार आहे. तथापि, माहे मार्च २०२० मध्ये जे कर्मचारी सेवानिवृत्त होणार असतील त्यांचा परतफेडीचा शिल्लक हप्ता त्यांना देय असणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील वेतनातून वसुल करण्यात यावा.

४) व्यवसाय कर व गट विमा योजनेची १००% कपात पहिल्या टप्प्याच्या वेतनातून करण्यात यावी.

५) शासकीय निवासस्थान धारकांच्या बाबतीत अनुज्ञप्ती शुल्क व सेवाशुल्क यांची १००% कपात पहिल्या टप्प्याच्या वेतनातून करण्यात यावी.

**५.** देयकासोबत न चुकता ब्रोकन पिरीयड समरी रिपोर्ट जोडण्यात यावा.

**६.** **अ)** आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी यापूर्वीच देयके तयार करुन कोषागारात सादर केलेली असतील तर अशी देयके कोषागारातून आक्षेपित करण्यात यावी. तदनंतर आहरण व संवितरण अधिकारी यांनी बीम्स प्राधिकारपत्र व सेवार्थमधील वेतन देयक रद्द करुन नव्याने देयक तयार करावे.

**ब)** आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सेवार्थ प्रणालीत देयके तयार करुन त्याचे “बीम्स” प्राधिकारपत्र देखील तयार केले असेल, मात्र अद्यापि कोषागारात देयक सादर केले नसेल अशा प्रकरणी देयक कोषागार कार्यालयात सादर करुन ते आक्षेपित करुन घ्यावे.

**७.** कर्मचाऱ्यांचा अ, ब, क व ड यापैकी गट ठरवितांना कर्मचारी सध्या ज्या पदावर कार्यरत आहे ते पद विचारात घ्यावे. कर्मचाऱ्याला लागू असलेल्या वेतनश्रेणीचा विचार करण्यात येवू नये.

**८.** सेवार्थ प्रणालीशिवाय वेतन आहरित करणाऱ्या इतर आस्थापनांनी वेतनाची परिगणना उपरोक्त सूचना विचारात घेवून त्यांच्याकडील प्रणालीद्वारे अथवा हस्तलिखित पध्दतीने करावी.

**९.** माहे मार्च, २०२० चे उर्वरित वेतन दुसऱ्या टप्प्यात अदा करावयाचे आहे. दुसऱ्या टप्प्याच्या कार्यपध्दतीबाबत स्वतंत्ररित्या आदेश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०२००४०११२२७३३७९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

INDRAJEET
SAMBHAJI
GORE

**(इंद्रजित गोरे)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत-**

१.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव.
४. मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव.

५. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव.

६. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.

८. मंत्रालयीन सर्व विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.

९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.

१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.

११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, नागपूर

१२. महालेखापाल (लेखापरिक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.

१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर.

१४.आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२.

१५.आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१.

१६.प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई.

१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

१८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.

२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदर, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली.

२३. सर्व विभागीय आयुक्त.

२४. सर्व जिल्हाधिकारी.

२५.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२८. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.

२९.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.

३०. सह संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.

३१.वित्त विभागातील सर्व कार्यासने.

३२.निवड नस्ती कोषा प्रशा-५.